



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध,अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३६०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.१० ऑगस्ट २०२५



**पाहिजेत !!** राजेंद्र कुमार : ९४२२६७५१६४

एखादे कुटुंब हवे आहे, जे शेती काम करतील. माझ्या घरातील व शेतीवरील कामात caretaker म्हणून काम पाहतील.

**प्रथम पगार रुपये ८,०००/- ते रुपये १५,०००/- प्रतिमाह**
**एका मुलाचा शालेय शिक्षण खर्च समाविष्ट**

गाईचा गोठा सर्व कामे : दूध काढणे, चारा देणे, गोठ्यात इतर कामे...
शेतीवरील काम : शेतीवरील कामात लक्ष देणे, पाणी पंप सुरू करणे व शेताला पाणी पुरवठा करणे, माणसे काम करतील ते पाहणे व ईतर काही कामे.

**राहण्याची सोय आहे... ५ वर्षे करार असेल...**
**गाव : लोणविरे तालुका : सांगोला जिल्हा : सोलापूर**


## लाडक्या बहिणींची चिंता वाढवणारी बातमी! २६ लाख महिलांची चौकशी होणार

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु होण्यास आता एक वर्ष पूर्ण झालं आहे. राज्य सरकारकडून गेल्या वर्षभरापासून १ कोटी पेक्षा जास्त महिलांना या योजनेच्या माध्यमांतून दर महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत दिली जात आहे. पण विधानसभा निवडणुकीनंतर या योजनेचे निकष तपासले जात आहेत. यामध्ये लाखो महिला या अपात्र असल्याचं समोर आलं आहे. आतादेखील राज्यातील २६ लाख महिला या अपात्र असल्याची माहिती समोर आली आहे. या म हिलांची आता चौकशी होणार आहे. यासाठी सरकार घरोघरी जावून या म हिलांचा शोध घेणार आहे.

विशेष म्हणजे रक्षाबंधनाच्या मुहुर्तावर लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात नुकताच जुलै महिन्याचा हप्ता जमा झाला आहे. पण आता लाडक्या बहिणींची चिंता वाढवणारी बातमी आहे. कारण राज्य सरकार आता राज्यातील तब्बल २६ लाख लाडक्या




बहिणींची चौकशी होणार आहे. राज्यातील २६ लाख महिलांच्या घरी जावून चौकशी केली जाणार आहे.

**महिला बालकल्याण विभागाचं जिल्हा प्रशासनाला पत्र...**

लाडकी बहीण योजनेसाठी विविध निकष ठेवण्यात आले होते. त्या निकषांच्या आधारे लाभार्थी महिलांनी अर्ज दाखल केला होता. आता सरकार घरोघरी जावून लाभार्थी महिलांचे अर्ज आणि पात्रता तपासणार आहे. विशेष म्हणजे लाभार्थी महिलांची चौकशी करण्यासाठी महिला बालकल्याण विभागाकडून जिल्हा प्रशासनाला आदेश देण्यात आला आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाला आदेशाचं पत्र देण्यात आलं आहे.

**अंगणवाडी सेविका कसा तपास करणार?**

जिल्हा पातळीवरील महिला आणि बालकल्याण विभागाच्या अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून ही अपात्र लाभार्थी महिला शोधण्याची मोहीम आता सुरु करण्यात आली आहे. लाडकी बहीण योजनेत एकाच घरातील दोन पेक्षा जास्त महिलांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. मात्र दोन पेक्षा जास्त आणि २१ ते ६५ वर्षे वयोगटात न बसणाऱ्या तब्बल २६ लाख महिलांना या योजनेचा लाभ घेतल्याची माहिती समोर आली होती. या महिलांची यादी महिला आणि बालकल्याण विभागाने तयार केली आहे.

अंगणवाडी सेविका असलेल्या एका महिलेने याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. दोन प्रकारचे निकष सांगितले आहेत. वयोमर्यादा बरोबर आहेत, बोगस कागदपत्रे भरले आहेत का, अशा प्रकारची तपासणी करा. त्यांचा निर्गम उतारा पाहा, टीसी पाहा, अशा प्रकारची तपासणी करा. घरातील तीन महिला असतील तर दोघांना पात्र करा आणि एकीला अपात्र करा. टॅक्सधारक, वाहनधारक, चारचाकी आहे का, याची तपासणी करा. चारचाकीचा नंबर बघा. याबाबत घरोघरी जावून चौकशी करा, असा आदेश दिला आहे, अशी प्रतिक्रिया एका अंगणवाडी सेविकेने दिली.

## पोडसा जुगारकांड उघडकीस ! मनोरंजन क्लबवर पोलिसांची धडक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, गोंडपिपरी (चंद्रपूर)** : स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर आणि उप पोलीस स्टेशन लाठी यांच्या संयुक्त कारवाईत पोडसा (ता. गोंडपिपरी) येथील मनोरंजन क्लब वर धाड टाकून अनधिकृत जुगार अड्डा उध्वस्त करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, राजीव समाधान मल्टीपरपज सोसायटी, हिरापूर शाखा पोडसा (रजि. नं. एफ-००१४८११) येथे चालक महेश्वर गोपालनायक अजमेरा (वय ४२, रा. चिंताकुंडा, ता. शिरपूर, जि. आसिफाबाद, तेलंगणा) याने संयोजकाच्या संगनमताने परवाना अटींचे उल्लंघन करत जुगार खेळवला. कारवाई दरम्यान डीव्हीआर, ताशपत्ते, नाणी, रजिस्टर असा एकूण ₹३,४५० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. क्लब चालक, संयोजक, जुगार खेळणारे व अपप्रेरणा देणारे आरोपी यांच्यावर विविध कलमांन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

**: पोलिसांचे आवाहन :**

नागरिकांनी परिसरात अशा प्रकारचे बेकायदेशीर जुगार अड्डे असल्यास त्वरित जवळील पोलीस स्टेशनला किंवा पोलीस नियंत्रण कक्ष, चंद्रपूर (डायल ११२) वर संपर्क साधावा.

## पाटण तालुक्यात रक्षाबंधन उत्साहात



**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०९, पाटण :** श्रावण महिन्यातील पौर्णिमेला येणारा रक्षाबंधन हा सण , पाटण तालुक्यात, मोठ्या उत्साहात आनंदात साजरा होताना दिसत होता. आज सकाळपासून पावसाने उघडीप दिल्यामुळे रक्षाबंधन सण मोठ्या उत्साहात साजरा होताना दिसत होता. सकाळपासूनच महिलांची भावाला राखी बांधण्यासाठी माहेरी जाण्याची ओढ लागली होती. तर,

राखीचे स्टॉल पाटण मुख्य बाजारपेठेत, लायब्ररी चौक, झेंडा चौक, नवीन बस स्थानक, जुने बसस्थानक या ठिकाणी राखी विक्रीस मोठ्या प्रमाणात दिसत होत्या.

आपल्या लाडक्या भावाला राखी घेण्यासाठी राखीच्या दुकानात व स्टॉलवर बहिणींची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसत होती. भावाला गोड मिठाई भरवण्यासाठी मिठाईच्या दुकानात गर्दी जाणवत होती.

भाऊ बहिणीला राखीचे गिफ्ट घेण्यासाठी इलेक्ट्रिक दुकानात, मोबाईल दुकानात, कापड दुकानात, बेकरीमध्ये, तोबा गर्दी दिसत होती. फोटो स्टुडिओ मध्ये जाऊन राखी बांधताना फोटो काढताना गर्दी जाणवत होती. ग्रामीण भागात मिळेल त्या वाहनातून व स्वतच्या वाहनातून राखी बांधायला जाण्यासाठी बहिणींची लगबग उडाली होती. पाटणच्या मुख्य बाजारपेठेत गर्दी जाणवत होती.

रक्षाबंधनाचा सण आनंदात मोठ्या उत्साहात साजरा होताना दिसत होता. काही बहिणीने भाऊ परगावी असल्याने व्हिडीओ कॉलदारे राखी बांधण्याचा आनंद घेतला. भावांनी बहिणीला ऑनलाइन ओवाळणी दिली. अन्य उपस्थित भावंड असणार्यांनी एकमेकाशी व्हिडिओ कॉलदारे बोलण्याचा आनंद घेताना दिसत होते.

सकाळी सात वाजल्यापासून ते सायंकाळी दहा वाजेपर्यंत बहिणीने भावाला राखी बांधण्याचा आनंद घेतला. भावांनी बहिनीला गिफ्ट देण्यात कोणती कसर राखली नाही. तर, रक्षाबंधनाचा सण मोठ्या आनंदात साजरा झाला.

## देवाभाऊ लाडकी बहीण महिला नागरी सहकारी पतसंस्थेचे हस्ते उद्घाटन

### महिलांच्या आर्थिक सबलीकरणासाठी पतसंस्थांची गरज : ना.बावनकुळे

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, बुलडाणा :** चिखली तालुक्यातील देवाभाऊ लाडकी बहीण महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित पतसंस्थेचे उद्घाटन आज राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कामगार मंत्री आकाश फुंडकर उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमाच्या वेळी संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष तथा आमदार श्वेता महाले, आम दार संजय गायकवाड, माजी आमदार विजयराव शिंदे, माजी आमदार शशिकांत खेडेकर, माजी आमदार तोताराम कायदे, तसेच जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, उपविभागीय अधिकारी शरद पाटील, तहसिलदार संतोष काकडे आदी उपस्थित होते.

उद्घाटनानंतर ना. बावनकुळे यांनी संस्थेच्या कार्याची माहिती घेतली. महिलांना आर्थिक सबलीकरणासाठी अशा संस्थांची गरज अधोरेखित केली. महिलांना आर्थिक व्यवहारात सक्षम बनविण्यासाठी पतसंस्था महत्त्वाची भूमिका बजावतात. देवाभाऊ लाडकी बहिण पतसंस्थामुळे स्वयंरोजगार व बचत संस्कृती बळकट करण्यास मदत करेल, असा विश्वास व्यक्त केला. या पतसंस्थेच्या राज्यभर शाखा उभारून लाडक्या बहिणींना आर्थिकदृष्ट्या साक्षर व सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले, शासन गोरगरीब, शेतकरी व सामान्य नागरिकांसाठी काम करत आहे. लाडक्या बहिणींना दरमहा १,५०० रुपये दिले जात आहेत, शेतकऱ्यांना मोफत वीज दिली जात आहे.

लवकरच समितीचे सर्वेक्षण पूर्ण करून गरजू शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. स्वस्तात शेतजमीन मोजणी, विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे अल्पदरात उपलब्ध करणे, नकाशा योजनेद्वारे प्रॉपर्टी कार्ड, स्वामि त्व योजना, पाणंद रस्ता, तुकडेबंदी कायदा रद्द करणे असे ऐतिहासिक निर्णय शासनाने घेतले आहेत. चिखली तालुक्यातील जिवंत सातबारा मोहिम संपूर्ण राज्यासाठी प्रेरणादायी असल्याने ती राज्यभर राबविण्याचा निर्णय घेतल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी




सांगितले.

कामगार मंत्री आकाश फुंडकर म्हणाले, चिखली तालुका हा पतसंस्थांचा माहेरघर आहे. देवाभाऊ लाडकी बहीण पतसंस्थेमुळे महिलांना बचत ठेवण्याचे हक्काचे ठिकाण मिळाले आहे. केवळ अल्पावधीत २,५०० बहिणींनी येथे खाते उघडून हे सिद्ध केले आहे. या पतसंस्थेमार्फत महिलांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध होणार असून महिलांनी स्वयंरोजगारासाठी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

आमदार श्वेता महाले यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या भावी योजनांची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, देवाभाऊ लाडकी बहीण पतसंस्था ही महाराष्ट्रातील पहिली महिलांची नागरी पतसंस्था असून, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा नवा टप्पा ठरेल. या उपक्रमाचा उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना स्वावलंबी बनवणे आणि लोकसंख्येतील सुमारे ४० टक्के हिस्सा असलेल्या महिलांना उद्योग, व्यवसाय व आर्थिक व्यवहारात प्रोत्साहन देणे हा आहे. उद्घाटन सोहळ्यासाठी स्थानिक मान्यवर, नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते, तसेच विविध महिला बचतगटांच्या प्रतिनिधीं, मोठ्या संख्येने नागरिक, महिला सदस्य आणि स्थानिक रहिवासी उपस्थित होते.

## कोराडी मंदिर परिसरात भीषण दुर्घटना, बांधकामाचा भाग कोसळला; १७ मजूर जखमी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०९, नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील कामठी तालुक्यातील कोराडी मंदिर परिसरात शनिवारी रात्री एक भीषण अपघात घडला. कोराडी मंदिराच्या मागील बाजूस, खापरखेडा-कोराडी रोडवर सुरू असलेल्या महाद्वाराच्या बांधकामादरम्यान गेटचा एक भाग अचानक कोसळला. या दुर्घटनेत सुमारे १७ म जूर जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली असून, घटनेनंतर घटनास्थळी तातडीने बचावकार्य सुरू करण्यात आले आहे. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

हा अपघात रात्री अंदाजे आठ ते सव्वा आठच्या दरम्यान घडला. त्या वेळी बांधकामाचे काम वेगात सुरू होते. अचानक एका बाजूचा बांधकामाचा भाग भारभरून खाली कोसळला. धक्कादायक म्हणजे, काही मजूर त्या भागाजवळ काम करत होते, ज्यामुळे ते मलब्याखाली दबले गेले. घटनेची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मि



ळताच कोराडी पोलिस स्टेशनचे अधिकारी, स्थानिक पोलीस, आणि एनडीआरएफ ची पथकं घटनास्थळी दाखल झाली. अत्याधुनिक यंत्रसामग्रीच्या सहाय्याने मलबा हटवण्याचे काम सुरू आहे. रात्रीच्या अंधारामुळे आणि कोसळलेल्या भागाच्या जड वजनामुळे बचावकार्य आव्हानात्मक ठरत आहे. तरीही, पथकांनी परिसर सील करून शिस्तबद्ध पद्धतीने कार्यवाही सुरू ठेवली आहे. प्राथमिक माहितीनुसार, गेटच्या खांबांचे कॉंक्रीटिंग पूर्ण झाले होते, मात्र लोखंडी स्ट्रक्चर बसवण्याचे काम सुरू असताना हा अपघात झाला. कोसळण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट नाही. बांधकामाची गुणवत्ता, स्ट्रक्चरची स्थिरता आणि सुरक्षाविषयक नियमांचे पालन झाले होते का, याबाबत प्रशासनाने तपास सुरू केला आहे. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांची प्रकृती सध्या स्थिर असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी डॉ. बिपिन इटनकर यांनी घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, परिस्थिती नियंत्रणात आहे. बचावकार्य वेगाने सुरू आहे. जखमींना आवश्यक ती सर्व वैद्यकीय मदत पुरवली जात आहे. आम्ही पालकमंत्र्यांशी सातत्याने संपर्कात आहोत.

कोराडी हे नागपूर जिल्ह्यातील एक महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे, जिथे वर्षभर मोठ्या संख्येने भाविक येतात. मात्र अपघाताच्या वेळी मंदिर परिसरात भाविकांची गर्दी नसल्यामुळे मोठी जीवितहानी टळली. तरीही, या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासन, आपत्कालीन सेवा आणि संबंधित विभाग एकत्रितपणे कार्यरत असून, अपघाताचे कारण शोधण्याचे कार्य सुरू आहे.




## राखी पौर्णिमा...

आज श्रावण पौर्णिमा आजचा दिवस संपूर्ण देशात राखी पौर्णिमा म्हणून साजरा केला जातो. राखी पौर्णिमा हा हिंदू संस्कृतीतील एक महत्वाचा सण मानला जातो. बहीण भावाच्या पवित्र नात्याला बंधनात बांधणारा हा सण.

या दिवशी बहीण आपल्या भावाच्या उजव्या हाताच्या मनगटावर राखी बांधून त्याच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करते. भाऊ देखील आपल्या लाडक्या बहिणीला तिच्या आवडीची भेट देऊन तिला तिच्या सुरक्षेची हमी देतो त्यामुळे या सणाची बहीण भाऊ दोघेही आतुरतेने वाट पाहत असतात. विशेषतः जे बहीण भाऊ एकमेकांपासून लांब असतात त्यांना या निमित्ताने एकमेकांची भेट घेता येते. आपली सुख दुःख एकमेकांना सांगता येतात आणि जुन्या बालपणीच्या आठवणींना उजाळा मिळतो. राखी पौर्णिमा या सणाला पौराणिक इतिहास आहे. पुरातन काळात जेंव्हा स्त्री स्वतःला असुरक्षित मानत होती तेंव्हा ती अशा व्यक्तीस राखी बांधून भाऊ मानत असे जो तिची रक्षा करील. इंद्राच्या राणीने आपल्या मनगटावर एक धागा बांधला होता. ज्याच्या समर्थ्याने वज्रासुर राक्षसाचा पराभव केला तेव्हापासून त्याची स्मृती म्हणून मनगटावर राखी बांधण्याची पद्धत सुरू झाली असे मानले जाते. तसेच ऐतिहासिक काळात चित्तोडच्या राणी कर्मवतीने हुमायून बादशहाला राखी पाठवली व हुमायून बादशहाने देखिल आपल्या या बहिणीचे परकीय आक्रमणापासून संरक्षण केले.

राखी पौर्णिमेचे असे अनेक दाखले पुराणात आणि इतिहासात पाहायला मिळतात. राखी पौर्णिमेला रक्षा बंधन असेही म्हणतात. राखी बांधण्याचा अर्थ आपण त्या व्यक्तीच्या बंधनात स्वतःला वाहून घेऊन तिच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारतो. राखी पौर्णिमेच्या दिवशी राखीचा धागा बांधून भाऊ बहिणीच्या रक्षणाची जबाबदारी स्वीकारतो म्हणूनच या सणाला रक्षा बंधन असेही म्हणतात. रक्षा करणे जबाबदारी स्वीकारणे. या दिवशी भाऊ आपल्या बहिणीची जबाबदारी स्विकारतो. वडीलांच्या पश्चात भाऊ आपल्या बहिणीची सर्व परिस्थितीत जबाबदारी स्वीकारतो तर आईच्या पश्चात भावास आईचे निरपेक्ष प्रेम देणे, काळजी घेणे याची जबाबदारी बहीण स्वीकारते म्हणून याला रक्षा बंधन असे म्हणतात. या दिवशी बहीण आणि भाऊ एका पवित्र बंधनात बांधले जातात म्हणून या सणाला बहीण भावाच्या पवित्र नात्याच्या सण असे म्हटले जाते. राखी बंधनाच्या या पवित्र सणातून मित्रत्व, स्नेह व परस्पर प्रेम वृद्धिंगत होते. आपल्या संस्कृतीत स्त्रीला देवी मानले जाते. अशी ही देवतुल्य स्त्री म्हणजे बहीण आपल्या भावाला राखी बांधण्यापूर्वी त्याच्या कपाळावर टिळा लावते. हा टिळा फक्त मस्तकाच्या आदरचा नसून भावाच्या मस्तकातील सदविचार व सदबुद्धि जागृत राहण्यासाठीची ही पूजा असते. राखीचा धागा हा नुसताच सुताचा धागा नसून ते शील, स्नेह, पवित्रतेचे रक्षण करणारे, सतत संयमी ठेवणारे पुरुषार्थाचे बंधन आहे. ह्या एव्हढ्याशा धाग्याने कित्येक मने जुळून येतात. त्यांना भावनांचा ओलावा मिळतो व मन प्रफुल्लित होतो.

एकमेकांना जोडणारा हा सण सामाजिक ऐक्याची भावना जागृत ठेवणारा आहे. रक्ताच्या नात्याव्यतिरिक्त आपल्या मनाप्रमाणे नाती जोडण्यास ह्या सणामुळे समाजास वाव मिळतो. ज्याला सख्खी बहीण नाही किंवा जिला सख्खा भाऊ नाही ती बहीण मानस भावाला राखी बांधते आणि बहीण भावाचे पवित्र नाते वृद्धिंगत करते असा हा बहीण भावाच्या पवित्र नात्याचा सणाच्या सर्व भारतीयांना शुभेच्छा!

# ऑगस्ट क्रांती दिन

९ ऑगस्ट हा दिवस संपूर्ण देशात ऑगस्ट क्रांती दिन म्हणून साजरा करण्यात आला. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करण्यासाठी ज्यांनी प्राणाची आहुती दिली त्या हुतात्म्यांचा स्मरण करण्याचा दिवस म्हणजे ९ ऑगस्ट अर्थात क्रांती दिन ! स्वातंत्र्यलढ्याची मशाल पेटवत देशातून इंग्रज राजवटीला नेस्तनाबूत करण्याची हाक देणाऱ्या तमाम ज्ञात अज्ञात क्रांतिवीरांना अभिवादन करण्याचा हा दिवस.

इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य करण्याचा दिलेला शब्द न पाळल्यामुळे या आंदोलनाची सुरुवात झाली. ८ ऑगस्ट १९४२ रोजी भारताला स्वातंत्र्य देणार असल्याची घोषणा इंग्रज सरकारने केली होती मात्र ऐनवेळी भारताला स्वातंत्र्य देणार नसल्याचे इंग्रजांनी सांगितले. त्यामुळे महात्मा गांधींनी देशभर ऑगस्ट क्रांती आंदोलनाची घोषणा केली. या आंदोलनाला चले जाओ आंदोलन असेही नाव देण्यात आले. करो या मरो अशी घोषणा या आंदोलनात करण्यात आली. दीडशे वर्षे भारतावर राज्य करणाऱ्या इंग्रजांना देशातून हुसकावून लावण्यासाठी ९ ऑगस्ट १९४२ रोजी क्रांतीची ठिणगी पडली




होती. ९ ऑगस्ट रोजी महात्मा गांधींसह अनेक ज्येष्ठ नेत्यांना इंग्रजांनी अटक केली होती त्यामुळे संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट पसरली होती. महात्मा गांधींच्या झालेल्या अटकेला विरोध करण्यासाठी संपूर्ण देश एकवटला होता. इंग्रजांनी नेत्यांची धरपकड केल्याने आंदोलन लोकांच्या ताब्यात गेले. देशभर जागोजागी हरताळ, मिरवणुका, मोर्चे यांना ऊत आला. सरकारने लोकांना एकत्र येण्यास बंदी घातली पण लोक सरकारचे आदेश मानायला तयार नव्हते. आंदोलक पोलिसांच्या लाठीहल्ल्याला, गोळीबाराला जुमानत नव्हते. जाळपोळ, पोलिसांचे खून, टेलिफोन व तारा कापणे असे प्रकार सुरू झाले.

जणू लोकांनी ब्रिटिश सत्तेविरूद्ध युद्ध पुकारले होते. संपूर्ण देश पेटला होता. दंगल, जाळपोळ, गोळीबार, रेल्वेचे अपघात, सरकारी कार्यालयांना आगी लावणे, सरकारी खजिन्यांची लुटालूट असे प्रकार सुरू होते. इंग्रजांच्या दडपशाही विरुद्ध संपूर्ण देश एकवटला होता. देशवसियांच्या एकजुटीने इंग्रजांना गुडघे टेकायला लावले होते. दुसऱ्या महायुद्धाने खिळखिळ्या झालेल्या ब्रिटिश सरकारची या आंदोलनामुळे उरली सुरली ताकदही लोप पावत चालली होती. त्यानंतर देशवासीयांनी इंग्रजांना भारतातून हाकलून लावे पर्यंत हे आंदोलन सुरूच ठेवले. भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य मिळाल्यापासून या आंदोलनात बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना श्रद्धांजली म्हणून हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन म्हणून साजरा केला जातो. मुंबईतील ज्या मैदानावर तिरंगा फडकावून या आंदोलनाची सुरुवत करण्यात आली त्या मैदानाला क्रांती मैदान असे नाव देण्यात आले आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात १८५७ नंतरचा हा सर्वात मोठा स्वातंत्र्य लढा होता म्हणूनच या लढ्याला भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात खूप महत्वाचे स्थान आहे.

**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# रक्षाबंधन उत्सवात मुख्यमंत्री फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, मुंबई :** मुलुंड येथील महाकवी कालिदास नाट्यमंदिरात आयोजित करण्यात आलेल्या रक्षाबंधन उत्सवात मुख्यमंत्री दवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, आमदार मिहीर कोटेचा यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, विविध मान्यवर व महिला भगिनी उपस्थित होते. यावेळी उपस्थित महिला-भगिनींनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना राखी बांधली. महिलांच्या सामाजिक व आर्थिक रक्षणासाठी शासन सदैव त्यांच्या



पाठीशी उभे राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी रक्षाबधनाच्या शुभेच्छांसह दिली. महिलासक्षमीकरण हा कोणत्याही राष्ट्राच्या विकासाचा कणा असतो.

समाजातील महिला मुख्य प्रवाहात येतील तेव्हाच राष्ट्राच्या विकासाला गती येते. महिलांना अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग बनवल्याने देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होते. महिलांच्या ५० टक्के सहभागाशिवाय राष्ट्राचा सर्वांगीण विकास शक्य नाही, असे सांगून बचत गटांच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्यासाठी १० जिल्ह्यांमध्ये 'बचत गट मॉल्स' तयार करण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिली.

## संघर्ष ...



**वरून मिळे आदेश**
**चला करा रे संघर्ष**
**नव्या उमेदीसह बा**
**भेटा जनेतेस सहर्ष**

**कोण राहे सत्तेविना**
**सांगावे किती रे वर्ष**
**नवासांगाडा बांधला**
**करून विचारविमर्श**

**खुर्ची येता पक्षाकडे**
**पुन्हासाधालं उत्कर्ष**
**जुनेदिवस आनंदाचे**
**आठवण होई प्रकर्ष**

**शांतता हवी पुढे तर**
**दूर सारायचा अमर्ष**
**उच्चस्थाने विराजावे**
**कुणा नाही अनुकर्ष**

**त्वरित निर्णय जरूरी**
**ना करी कालापकर्ष**
**दूरून पाही सिंहासन**
**करुनि पाहू या स्पर्श**

**खुर्चीविरह न सोसत**
**असह्य सत्ताविप्रकर्ष**
**कितीही जरी निरपेक्ष**
**खुर्चीपुढेचं झुके शिर्ष**

**- हेमंत मुसरीफ, पुणे**

# कलगी तुरा परंपरेतील ब्रीदपूजन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०९, मुंबई :** कलगी तुरा लोककलेत शाहिरी कलेची अमूल्य परंपरा आणि पूर्वजांनी दिलेला सांस्कृतिक ठेवा जतन व संवर्धन त्याचबरोबर गुरु-शिष्य परंपरेचा गौरवशाली वारसा जपणारी कोकणातील शाहिरी लोककलावंतांची मातृसंस्था कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई ह्या संस्थेच्या वतीने सालाबादप्रमाणे नारळी पौर्णिमेच्या पावन दिनी दिनांक ०८ ऑगस्ट २०२५ रोजी कुणबी समाजोन्नती संघ, वाघे हॉल, परळ मुंबई-१२ येथे गुरु-शिष्य सागरीत मांड ब्रीद पूजन सोहळा मंगलमय वातावरणात, डफ-तुणतुणं - ढोलकी - टाळ या संगीताच्या गजरात, अनेक शाहिर, वस्ताद, हितचिंतक व चिट्ठी मालक मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात भक्तिभावाने संपन्न झाला.

सोहळ्यात गुरुजनांनी आपल्या कृपाशिर्वादाने नव्या शिष्यांना दीक्षा देऊन शाहिरी परंपरेचा दिवा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवला. मंडळाचे सरचिटणीस संतोष धारशे यांनी उपस्थित मान्यवर आणि शाहीर कलाकारांचे स्वागत करून ब्रीद पूजन आणि सागरीत मांड याची माहिती दिली. सुरेश ऐनारकर, मधुकर पंदेरे, पांडुरंग देवळेकर,



उमेश वाजे, अनंत चिले, अनंत कुळे, चंद्रकांत धोपट अशा शाहिरी मंडळींनी डफ शाहिरी सादरीकरण केले त्यास सुरेश चिबडे, दामोदर गोरीवले यांनी ढोलकीला साथ देत सदर सोहळा अधिक रंगतदार करत उपस्थितांची मने जिंकली. सदर सोहळ्याला कलगी तुरा समन्वय समिती अध्यक्ष अभय दादा सहस्त्रबुद्धे, नमन लोककला संस्था अध्यक्ष-रवींद्र मटकर, कुणबी समाजोन्नती संघ सरचिटणीस -कृष्णा वने, चिटणीस संजय उमसरे आदी प्रमुख मान्यवर तसेच शाहिरी कलाकार शाहीर रामचंद्र घाणेकर, मधुकर पंदेरे, विकास लांबोरे, कृष्णा जोगळे, चंद्रकांत धोपट, प्रभाकर कळबटे, भिकाजी भुवड,संजय गोणबरे, योगेश कातकर, विनोद फटकरे, राजेश निकम, सदानंद सरवंदे, रुपेश साटले, भरत गाणेकर, प्रवीण कुळे, रवींद्र नाचरे, नितीन रसाळ, नितीन मास्कर, उदय चिबडे, मधुकर पंदेरे, संतोष कोलापटे, प्रमोद घुमे, शरद कदम, सुधाकर गोंणबरे, मनोहर वाडकर, नरेंद्र पाले, हिराचंद्र पिचूर्ले, सीताराम शिगवण, तुषार पंदेरे, शाहीर शंकर मालप, शांताराम गोताड, एकनाथ ठोंबरे, एकनाथ डिंगणकर आदी शाहिरी मंडळी तसेच चिट्ठी मालक, शाहीरहितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अध्यक्ष सुरेश ऐणारकर, उपाध्यक्ष सुरेश चिबडे, सरचिटणीस संतोष धारशे, सचिव सुधाकर मास्कर, सचिव दिलीप नामे, खजिनदार सुरेश कदम, सदस्य अनंत तांबे, अनंत मुंगळे, सत्यवान यादव, दामोदर गोरीवले, दीपक महादे,निलेश जोगळे, संतोष पारदले, उदय दणदणे यांनी विशेष परिश्रम घेतले. सदर सोहळ्याला समस्त उपस्थितांचे कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई सरचिटणीस संतोष धारशे यांनी आभार मानले आहेत.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते महाविर चौक मार्गावर १० ते १६ ऑगस्ट पर्यंत प्रतिबंधात्मक आदेश

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०९, नांदेड :** स्वातंत्र्य दिनानिमित्त शुक्रवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी शासकीय ध्वजारोहण समारंभ सोहळा शांततेत पार पाडण्यासाठी याकाळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये.

या दृष्टीकोनातुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा-छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा-जिल्हाधिकारी कार्यालय-महात्मा गांधी यांचा पुतळा ते महाविर चौक या मार्गावर १० ऑगस्ट रोजी २४.०० वा. ते १६ ऑगस्ट २०२५ रोजीच्या ००.०० वाजेपर्यंत उपोषणे,



आत्मदहने, धरणे, मोर्चा, रॅली, सत्याग्रह इत्यादी आंदोलनात्मक आयोजनास प्रतिबंध केले आहे.

या मार्गावर शांतता व कायदा सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी या काळात उपोषणे, आत्मदहने, धरणे, मोर्चा, रॅली, सत्यागृह इत्यादी आंदोलनात्मक आयोजनास प्रतिबंध केले आहे.

संबंधीतावर नोटीस बजावुन त्यांचे म्हणने ऐकुन घेण्यास पुरेसा अवधी नसल्याने आणीबाणीच्या प्रसंगी भारतीय नागरिक सुरक्षा संहीता २०२३ चे कलम १६३ (२) नुसार एकतर्फी आदेश निर्गमीत करण्यात आला आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## काकणेवाडीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर)** : तालुक्यातील श्री क्षेत्र काकणेवाडी येथे डॉ.कृष्णकृपंकित हभप डॉ.मिसाळ महाराज व डॉ.जाधव महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली भगवान श्रीकृष्ण जन्म ोत्सव व माऊली ज्ञानेश्वर महाराजांच्या जन्मोत्सवनिमित्त अखंड हरीनाम सप्ताह, पर्जन्य यज्ञ व संत बहिणाबाई गाथा पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहात ह.भ.प सवणे महाराज, सदगीर महाराज, येवले महाराज, डॉ.मिसाळ महाराज, ह.भ.प वाव्हळ महाराज, उगले महाराज, जामगांवकर महाराज व हभप कांबळे महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे.

डॉ.मिसाळ महाराज लिखित संत तुकाराम चरित्र ग्रंथ गवराम शेठ वाळुंज यांच्या सौजन्याने भेट देण्यात येणार आहे. कृष्ण जन्माच्या दिवशी रात्री विद्यार्थ्यांचे गोडी अभंगाचीया कार्यक्रमातर्गत अभंग गौळण गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सहभागी विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात येणार आहे. उपस्थित भाविकामधून दरोरोज पाच भाविकांना वृक्षमित्र भगवान शेठ वाळुंज यांच्या सहकार्याने आंब्याचे वृक्ष वाटप करण्यात येणार आहे. दि.१२ ऑगस्ट २०२५ रोजी दत्तात्रय शेठ नवले व नानासाहेब झावरे तसेच सर्व मुंबईकर मंडळी यांच्या विशेष सहकार्याने पर्जन्य यज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे. या पर्व काळात सर्वांनी अन्नदान आणि ज्ञानदानाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीराम भजनी मंडळ यांनी केले आहे.

## आज पिंपळगाव रोठा येथे श्रावण मासानिमित्त भव्य कार्यक्रम



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर)** : तालुक्यातील पिंपळगाव रोठा येथील लाखो भाविकांचे कुलदैवत असलेल्या स्वयंभू श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थानात आज श्रावण मासानिमित्त रविवार, दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी सकाळी ९ वाजता खंडोबा मंदिराच्या मुख्य महाद्वाराची भव्य मिरवणूक गावातून काढण्यात येणार आहे. कै.गेनभाऊ कोंडाजी भालेराव यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शांताराम गेनभाऊ भालेराव यांनी हा महाद्वार देवस्थानाच्या सेवेत अर्पण केला आहे. रथातून निघणारी ही मिरवणूक येळकोट येळकोट जय मल्हार च्या जयघोषात, ढोल-ताशांच्या गजरात, पिंपळगाव रोठा गावातून मोठ्या थाटामाटात मार्गस्थ होणार असून त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते नव्या महाद्वाराची स्थापना करण्यात येणार आहे. श्रावण मासाच्या पारंपरिक परंपरेनुसार, दुपारी १ वाजता कुस्त्यांची स्पर्धा भरविण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील नामवंत मल्ल आखाड्यात उतरणार असून निकाली कुस्त्यांसाठी भरघोस बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे. कार्यक्रमानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थान ट्रस्टने पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थ, भाविक व कुस्तीप्रेमींना या सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

## प्रा.भालेराव यांच्या संशोधनास युके सरकारकडून पेटंट



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर)** : डॉ.डी.वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पिंपरी येथील भूगोल विभागाचे सहाय्यक प्राध्यापक प्रा. वैभव रामदास भालेराव (मूळ गाव ढवळपुरी, ता. पारनेर, जि. अहमदनगर) यांना युके सरकारच्या कडून या नाविन्यपूर्ण डिझाइनसाठी अधिकृत डिझाइन पेटंट प्राप्त झाले आहे. बौद्धिक संपदा अधिकारांसाठी जबाबदार असलेल्या युके सरकारच्या या संस्थेमार्फत हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. या संशोधनामध्ये प्रा.भालेराव यांनी मानवसदृश यंत्र प्रणालीसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित नाविन्यपूर्ण म ार्गदर्शन यंत्रणा विकसित केली आहे. या उल्लेखनीय आंतरराष्ट्रीय यशामुळे महाविद्यालयाचा नाव लौकिक वाढला असून हे एक अभिमानास्पद संशोधन कार्य ठरले आहे. प्रा.भालेराव यांचे या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रणजित पाटील, भूगोल विभाग प्रमुख डॉ. रविंद्र शिंदे व सर्व प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थी वर्गाने त्यांचे अभिनंदन केले आहे.

## घरोघरी तिरंगा- हर घर तिरंगा' मोहिम अंतर्गत; एक राखी सैनिकांसाठी उपक्रम संपन्न



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०९, पनवेल** : म हानगरपालिकेमार्फत आयुक्त मंगेश चितळे यांच्या म ार्गदर्शनाखाली 'घरोघरी तिरंगा- हर घर तिरंगा' मोहीम पनवेल मनपा क्षेत्रात १५ ऑगस्ट पर्यंत विविध उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात राबविली जात आहे. या अंतर्गत रक्षाबंधनाचे औचित्य साधून 'एक राखी सैनिकांसाठी' हा नाविन्यपूर्ण उपक्रम विविध शाळांमध्ये राबविण्यात आला. शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सैनिकांच्या प्रति आदर व स्नेह व्यक्त करण्यासाठी तसेच त्यांच्या दीर्घायुष्यासाठी घरो घरी तिरंगा हर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत शाळा क्रमांक ५ जीवन शिक्षण विद्यामंदिर मोठा खांदा शाळेतील व रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी स्वतः राख्या तयार केल्या.

या राख्या राजस्थान सीमेवरील सैनिकांना पालिकेच्या वतीने पाठविण्यात येणार आहेत. मोठा खांदा मुख्याध्यापिका शोभा अवाड, रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे व सर्व शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी या राख्या तयार केल्या. सदर उपक्रमास समन्वय उपक्रमशील शिक्षक ज्ञानेश रामचंद्र आलदर, ज्योत्स्ना सरडा, वैभव पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले.

## तालुक्यातील प्रत्येक गावाला उन्नतीकडे नेण्यासाठी आपला नेहमीच प्रयत्न - झावरे

### विजेचा प्रश्न सुटला; ग्रामस्थांकडून समाधान




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०९, पारनेर (अहिल्यानगर)** : तालुक्यातील वासुंदे गावचे क्षेत्रफळ जिल्ह्यातील इतर गावांपेक्षा मोठे आहे. त्यामुळे गावाच्या शेवटच्या टोकापर्यंत वीजपुरवठा पोहोचवण्यात अडचणी येत होत्या.

सातत्याने उपाय शोधत असताना वासुंदे येथील गावठाण व बर्वे नगर या दोन नवीन स्वतंत्र ६३ केव्ही विद्युत रोहित्र नव्याने चालू करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. स्वतंत्र डीपी मिळावा यासाठी सुजित झावरे पाटील यांनी महावितरणकडे विशेष प्रयत्न केले होते.

गावठाण, बर्वे नगर मध्ये विद्युत भारामध्ये होणारा सततचा चढउतार याचा येथील रहिवाशांना सारखा सामना करावा लागत असे. दरवेळी येथील व्होल्टेज पूर्णपणे कमी होत असे. यास्तव येथील रहिवाशांची दोन्ही ठिकाणी स्वतंत्र डीपी मिळावा. अशी महावितरण कडे अनेक वर्षांपासूनची मागणी होती. सुजित झावरे पाटील हे, यामध्ये विशेष लक्ष घालून ती मागणी पूर्ण करून देण्यात यशस्वी झाले. मतदार संघातील प्रत्येक गावाला उन्नतीकडे नेण्यासाठी आपला कसोशीने नेहमीच प्रयत्न राहील असा आशावाद त्यांनी मनोगत यावेळी व्यक्त केला.

या डीपीच्या उद्घाटनप्रसंगी सरपंच विमल झावरे, उपसरपंच बाळासाहेब शिंदे, रणजीत पाटील, माजी उपसरपंच शंकर बर्वे, स्वप्निल झावरे, अंबादास झावरे, भाऊसाहेब सैद, दिलिप पाटोळे, बाळासाहेब झावरे, प्रविण झावरे, पो.मा.झावरे, सोन्याबापू बर्वे, सुभाष बर्वे, निवृत्ती बर्वे, दत्तात्रय गांगड, निखिल दाते, मनोज झावरे, शांताराम झावरे, पोपट हिंगडे, सुदाम भालके, ग्रामविकास अधिकारी भास्कर लोंढे वायरमन पंकज वतपाळ आदी उपस्थित होते.

> वासुंदे येथे असलेल्या रोहित्रानवर विजेचे कनेक्शन जास्त असल्याने विजेचा लोड जास्त येत होता. त्यामुळे नव्याने दोन रोहित्र सुजित झावरे पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे मंजूर झाले असून ते आज कार्यान्वित झाले आहे. त्यामुळे आता विजेचा प्रश्न सुटणार आहे.
>
> **- शंकर बर्वे (माजी उपसरपंच, वासुंदे)**

## दहिसर ठाकूरपाड्याची वाट खड्डेमय ठेवणाऱ्या लोकप्रतिनिधींचे आभार

### १४ गावातील त्रस्त रस्त्यांवर झळकलेले बॅनर चर्चेत; खासदार, आमदार यांसह मतदारांचे मानले आभार




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, दहिसर (ठाणे)** : कल्याण ग्रामीण विधानसभेतील १४ गावांमध्ये असणाऱ्या दहिसर ठाकूरपाड्याच्या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. रस्त्याच्या काँक्रीटीकरणासाठी निधी मंजूर असताना देखील ठेकेदाराने काम केलं नाही. पावसाळा सुरु असल्याने नागरिकांचे प्रचंड हाल या रस्त्यावर सुरु आहेत. या रस्त्याचे काम तातडीने करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा देखील करण्यात आला होता. मात्र या रस्त्याच्या कामाकडे दुर्लक्ष झाल्याने रस्त्याच्याकडेला आमदार, खासदार यांसह त्यांना भरघोस मतांनी निवडून देणाऱ्या मतदारांचे आभार व्यक्त करण्यात आले आहे.

ठाणे तालुक्यातील १४ गावांमध्ये रस्त्यांच्या काँक्रीटकरणासाठी निधी मंजूर झाला आहे. यामधील उत्तरशिव ते नारिवली रस्ता काँक्रीटीकरण करणे, दहिसर नाका ते ठाकूरपाडा गावदेवी मंदिर ते लोहपाडा रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याचे काम होते. ठेकेदाराच्या कंपनीला काँक्रिटीकरणाचे काम सुरु करण्याचे आदेश नोव्हेंबर २०२४ मध्ये देण्यात आले होते. मात्र रस्त्याच्या कामाला वेळेत सुरुवात न झाल्याने १४ गाव विकास समितीच्या पदाधिकाऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार केली होती. त्या तक्रारीनंतर ठेकेदाराला दंडात्मक कारवाईचा इशारा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहाय्यक अभियंत्यांनी लेखी दिला होता. मात्र त्यानंतर देखील रस्त्यांची काँक्रीटकरणाची काम ठेकेदाराने केली नसल्याने आता नागरिकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

१४ गावातील या रस्त्याच्या कडेला जागरूक नागरिकांनी होर्डिंग्स झळकवले आहेत. त्यात त्यांनी म्हटलं आहे कि, कल्याण ग्रामीणचे आंध्र तसेच लोकप्रिय आणि संसदरत्न खासदार माजी सरपंच १४ गाव ग्राम पंचायतीचे अत्यंत प्रामाणिक ग्रामसेवक मौजे दहिसर ठाकूरपाडा येथे चांगला दर्जे दार आणि उत्तम असा रस्ता दिल्याबद्दल आपणा सर्वांचे हार्दिक अभिनंदन आणि या सर्वांना भरघोस मतांनी निवडून दिल्याबद्दल जनतेचे पण मनपूर्वक अभिनंदन असे फलक झळकवले आहेत. एक त्रस्त ठाकूरपाडा निवासी असे या बॅनरवर लिहिण्यात आले आहे. त्यामुळे आता दुर्लक्षित १४ गावांमधील मंजूर असलेल्या रस्त्यांच्या कामांसाठी लोकप्रतिनिधी काय पाठपुरावा करणार ? याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

१४ गावांमध्ये रस्त्यांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. गावांची वाटचाल दिवसेंदिवस खड्डेमय होत आहे. तर रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाचा ठेका घेऊन कंपन्या काम करत नसल्याचे वास्तव समोर आणलं होत. त्यानंतर देखील लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाकडून रस्त्याच्या कामाकडे दुर्लक्ष करण्यात आलं आहे. सातत्याने रस्त्यांची काम होण्यासाठी पाठपुरावा करून सुद्धा त्याकडे दुर्लक्ष केलं जात असल्याने नागरिकांनी अनोखे फलक रस्त्याच्या कडेला झळकवले आहेत.

## कल्याण ग्रामीण मधील वन विभागाचे सीसीटीव्ही कॅमेरे अज्ञान इसमाने फोडले

### शिळ-डायघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०९, शिळफाटा (ठाणे)** : कल्याण ग्रामीण भागातील दिवा परिसरात शासकीय जमिनींवर अतिक्रम णाचे प्रमाण वाढत आहे. अतिक्रमण रोखण्यासाठी ठाणे वन विभागाने शिळफाटा परिसरात सीसीटीव्हीद्वारे नजर ठेवण्यास सुरुवात केली होती. परंतु अज्ञान इसमाने वनविभागाचे सीसीटीव्ही कॅमेऱ्याची खोडसाळपणे तोडून फोडून नुकसान केल्याची तक्रार पोलिसांत करण्यात आली आहे. शिळ-डायघर पोलिसांनी देखील वन विभागाच्या तक्रारीनंतर गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे.

कृष्णा हुलप्पा पोले वनरक्षक वय ३४ वनपरिमंडल कार्यालय कलवा व निवासस्थान गोठेघर यांनी अज्ञान इसम यांच्या विरोधात शिळ-डायघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. आहे. मौजे शिळ, खरवली देवी परिसर (भोलेनाथ नगर) पोस्ट डावले ता जि.ठाणे या ठिकाणी पुरांतन काळापासूनचे जागृत देवस्थान श्री खरवली आईचे मंदिर आहे. ही देवी भक्तांच्या हाकेला धावणारी आणि नवसाला पावणारी देवी आहे.

या देवीचा महिमा खूप मोठा आहे. खरवली आईच्या मंदिराकडे जाणाऱ्या रोडवर वन विभागात मार्फत ३१ जुलै २०२५ रोजी cofe या कंपनीचा ICCID ८९९१८७४०४००३८४०३५१२ सिमकार्ड क्र.९३२१६५०५०० चा सीसीटिव्ही कॅमेरा बसविण्यात आला होता सदर सीसीटिव्ही कॅमेराचा यातील विरोधकांनी खोडसाळपणे तोडून फोडून नुकसान केले आहे. म्हणून शिळ-डायघर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यात आली आहे. अदखलपात्र गुन्हा रजि नं १३७६/२०२५ भारतीया न्याय संहिता २०२३ चे कलम ३२४(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ग्रामस्थांच्या पाठपुराव्यानंतर ठाणे वनविभागाने परिसरातील हालचालींवर सीसीटीव्हीद्वारे नजर ठेवण्यास सुरुवात केली होती. मात्र हे सीसीटीव्ही चरशी गर्दुल्ले यांना अडचणीचे ठरत असल्याने त्यांनी लक्ष करून चक्क पोलवरचे सीसीटीव्ही कॅमेरे फोडले. या घटनेनंतर शीळ डायघर पोलीस ठाण्यात वनविभागाच्या कळवा परिमंडळ वनरक्षकाने तक्रार केल्यानंतर शीळ डायघर पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरू केला आहे.

वनविभागाच्या सीसीटीव्हीद्वारे ठेवण्यात आलेल्या नजरेवर चरशीगर्दुल्ले यांनी तोडफोड केल्याने खळबळ उडाली आहे. सध्या पोलिसांकडून सुरू असलेल्या तपासात आरोपी पोलिसांच्या तपासात कधी सापडणार व सीसीटीव्ही कॅमेऱ्याची तोडफोड करण्याचा त्याचा उद्देश समोर येणार का? हे आरोपीला अटक केल्यानंतरच समोर येणार आहे.

## कुंडलवाडीत गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०८, कुंडलवाडी (नांदेड)** : शहरात दहावी परीक्षेत ८५ टक्के व त्याहून अधिक गुण मि ळवणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा महायुतीतील पदाधिकारी, कर्मवीर सेवाभावी संस्था आयोजित केले. विशेष आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे गुणगौरव करण्यात आले. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, कुंडलवाडी शहरातील एकूण ४५ गुणवंत विद्यार्थ्यांपैकी तब्बल ३५ विद्यार्थी हे के.रामलू पब्लिक स्कूल, कुंडलवाडी येथील होते. ही बाब संपूर्ण शाळेसाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. त्यात विशेष तालुक्यात प्रथम येणारा अष्टमवार संकेत साईनाथ ९७.२०, दिडशेरे तुळशीराम ९६ टक्के केंद्रात द्वितीय तर तृतीय क्रमांक शेख आयान अलीम ९४.६० गुण घेणारे गुणवंत हे के.रामलू पब्लिक स्कूल कुंडलवाडीचे होते. या गौरव सोहळ्यात आमदार यांनी शाळेच्या विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व व्यवस्थापनाचे मनापासून कौतुक केले आणि सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. या यशाचे श्रेय शाळेचे अध्यक्ष सायरेड्डी ठक्करवाड, संचालिका रमा ठक्करवाड, प्राचार्य जे. संभाजी, उपप्राचार्य एम.सपना तसेच मेहनती शिक्षकवर्ग आणि कर्मचाऱ्यांना दिले जात आहे.

## रक्षाबंधनाच्या दिवशी टिळक नगर पोलीस ठाण्यात बहिणींचा स्नेहभाव व्यक्त



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०९, डोंबिवली (ठाणे)** : रक्षाबंधनाच्या पवित्र सणानिमित्त टिळक नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयकुमार कदम यांना स्थानिक रहिवासी महिलांनी बहिणीच्या नात्याने राखी बांधून स्नेह आणि विश्वासाचा धागा म जबूत केला. महिलांनी सांगितले की, विजयकुमार कदम हे महिलांविषयीच्या तक्रारींवर तत्काळ दखल घेऊन न्याय मिळवून देतात. यामुळे त्यांच्यावरील आणि संपूर्ण पोलीस दलावरील विश्वास अधिक दृढ झाला आहे. या प्रसंगी पोलीस स्टेशनमधील अधिकारी व अंमलदार यांनाही राखी बांधण्यात आली. रक्षाबंधनाचा हा अनोखा सोहळा भावंडांच्या नात्याप्रमाणेच नागरिक व पोलीस यांच्यातील परस्पर विश्वास व सुरक्षिततेचे प्रतीक ठरला.

# ऑटोरिक्षा चालकांच्या हितासाठी आ. मुनगंटीवार यांचे ठोस पाऊल

## नवीन ऑटोस्टँड, रिक्षा चालकांसाठी उपाययोजना

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०९, चंद्रपूर :** जिल्ह्यातील ऑटोरिक्षा चालक- मालकांच्या विविध समस्या आणि मागण्यांबाबत सकारात्मक दृष्टीकोन ठेवत राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने नियोजन भवन येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीमध्ये रिक्षाचालकांच्या अडचणी दूर करण्यासाठी ठोस निर्णय घेण्यात आले. हे निर्णय शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासोबतच रिक्षा चालकांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत ही सुधारणा घडवतील, असा विश्वास देखील आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला.



जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन सभागृह येथे ऑटो रिक्षा चालक-मालक संघटनेच्या समस्यांसंदर्भात आयोजित बैठकीत आ. मुनगंटीवार बोलत होते. बैठकीला संजीव रेड्डी बोदकूरवार, प्रभारी जिल्हाधिकारी डॉ. नितीन व्यवहारे, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकाडे, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, विभाग नियंत्रक स्मिता सुतावणे, प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे, डॉ.मंगेश गुलवाडे, तसेच नम्रता आचार्य ठेमस्कर, अजय सरकार, बंडू गौरकार, ऑटो मालक - चालक संघटनेचे अध्यक्ष मधुकर राऊत, संस्थापक अध्यक्ष राजेंद्र खांडेकर तसेच ऑटो रिक्षा चालक-मालक संघटनेचे सदस्य, पदाधिकारी आदींची उपस्थिती होती.

बैठकीत आ. मुनगंटीवार यांनी सांगितले की, महानगरपालिकेचे अधिकारी व ऑटो चालक-मालक संघटनेचे प्रतिनिधी यांनी प्रत्यक्ष ठिकाणी पाहणी करून व्यापारीदृष्ट्या उपयुक्त ठिकाणी ऑटो स्टॅन्ड विकसित करावेत. या स्टॅण्डमध्ये वाहतूक सुलभता, पार्किंग व्यवस्था व इतर सुविधा विचारात घेऊन उत्तम डिझाईन करावे.

बल्लारपूर, मुल, राजुरा, गडचांदूर, भद्रावती व गोंडपिपरी येथे देखील संभाव्य ठिकाणांची पाहणी करून ऑटो स्टॅण्डसाठी नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. यासाठी निधी रस्ते सुरक्षा योजना-२०१६ व डीपीडीसी अंतर्गत उपलब्ध करून दिला जाईल. ई-रिक्षा केवळ गरजू आणि पात्र व्यक्तींनाच वितरित व्हाव्यात, यासाठी प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने सुसंगत धोरण तयार करावे. ई-रिक्षा केवळ विशिष्ट मार्गांवरच चालवण्याचा प्रस्ताव असून, यासंबंधी लवकरच समर्पक मार्गदर्शक सूचना जारी केल्या जातील. याशिवाय सर्व वितरकांची यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. ३१ रिक्षा स्टॅण्डची संख्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बंगाली कॅम्प परिसरात दोन नवीन रिक्षा स्टॅण्ड विकसित केले जातील. आ. मुनगंटीवार यांनी सांगितले की, ऑटो रिक्षा चालक ही केवळ एक वाहतूक सेवा नसून, शहराच्या जीवनशैलीचा अविभाज्य भाग आहे. त्यांच्या अडचणी समजून घेऊन ठोस आणि समन्वयात्मक निर्णय घेणे ही आमची जबाबदारी आहे. शासन आणि चालक यांच्यातील समन्वय अधिक दृढ व्हावा. यासाठी या निर्णयांची अंमलबजावणी प्रभावीपणे केली जावी, अशा सूचना यावेळी आमदार मुनगंटीवार यांनी दिल्या.

# वेंकीज कंपनी संदर्भात गैरसमज पसरविण्याचा प्रयत्न - व्यवसथापक दौंडकर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.०९, पाटण (सातारा) :** बोंद्री व पिंपळोशी या दोन्ही ग्रामपंचायतीच्या हद्दीत कार्यरत असणाऱ्या वेंकीज इंडिया लिमिटेड या व्हॅक्शीनसाठी अंडी उत्पादीत करणाऱ्या कंपनी संदर्भात पूर्ण माहिती न घेता काही लोकांनी सोशल मीडिया व प्रसार माध्यमातून चुकीची माहिती पसरविली तशा प्रकारचे निवेदन त्यांनी प्रसार माध्यम व तहसिलदार पाटण यांना दिले आहेत. मात्र खरी वस्तुस्थिती वेगळी आहे. कोंबडी ट्रान्सफर करण्याच्या बाबतीत गैरसमज पसरविण्यात आला. याबाबत कंपनीचे व्यवस्थापक सतीश दौंडकर, सहाय्यक व्यवस्थापक रेडरेकर विशारद यांनी पत्रकारांशी बोलताना अधिक माहिती दिली. याबाबत अधिक माहिती सांगताना दौंडकर म्हणाले गेली ७ - ८ वर्षे वेंकीज कंपनी पिंपळोशी - बोंद्री ग्रामपंचायत हद्दीत कार्यरत आहे. आज अखेर कंपनीचा गावकऱ्यांना अथवा गावकऱ्यांचा कंपनीला कोणत्याही प्रकारचा अवास्तव त्रास झाला नाही. वेंकीज इंडिया लिमिटेड ही कंपनी जागतिक स्तरावर काम करते या कंपनीला राज्य शासन व केंद्र शासनाच्या सर्व मान्यता आहेत. शासन नियमावलीच्य बाहेर कंपनी कोणतेही काम करत नाही.

बोंद्री - पिंपळोशी याठिकाणी कंपनीचे हे एक युनिट आहे. येथे व्हॅक्शीन निर्मिती साठी कोंबडी पासून अंडी उत्पादीत केली जातात. अंडी बंद करणारी कोंबडी खत निर्मिती साठी पुणे




येथे पाठविण्यात येतात. या कोंबड्या वाहतूक करणारा ट्रक पावसातील चिखलामुळे कंपनी जवळ वळविण्यास अडचण निर्माण होत असल्याने दोन तीन दिवस पिंपळोशी - बोंद्री या मार्गावर रस्त्याच्या कडेला कोंबड्यांचे कॅरेट ट्रक मध्ये भरण्यात आले. कोंबडी भरताना कंपनीने सर्वतोपरी सर्व प्रकाराची काळजी घेतली. ती जागा त्या त्यावेळी स्वच्छ केली. त्या ठिकाणी सॅनीटॅझर करण्यात आले. झालेला कचरा जाळण्यात आला. कंपनीमुळे कोणालाही त्रास होणार नाही याची काळजी घेण्यात आली. आता पाऊस बंद झाला आहे. कंपनी खाजगी मालकी जागेत ट्रक वळविण्याची जागा कॉंक्रीट करण्यात आली आहे. येथून पुढे पहिल्या ठिकाणी कंपनीच्या जागेतच कोंबड्या ट्रान्सपोर्ट करण्यात येणार असल्याचे व्यवस्थापक दौंडकर यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# पोष्ट खात्याची टपाल सेवा १ सप्टेंबर पासुन बंद होणार

**अक्षराज : संजय पंडीत**

**दि.०९, मुंबई :** भारतीय पोस्ट खात्याने मोठा निर्णय घेतला आहे. १८५४ पासून मुंबईचं हृदय असलेली टपाल सेवा १ सप्टेंबरपासून आता बंद होणार आहे. त्यामुळे पत्रं नाही फक्त नोटिफिकेशन राहणार आहे. आता यापुढे महत्त्वाची कागदपत्रं आणि पार्सल पाठवण्यासाठी आता एकमेव स्पीड पोस्ट सेवा राहणार आहे. भारतीय पोस्टाची रजिस्टर्ड पोस्ट सेवा ५० वर्षांहून अधिक काळ असलेली सेवी आता भूतकाळात जाणार आहे. पोस्टानं आपलं काम फास्ट, ट्रॅक करण्यास सोपं आणि आधुनिक बनवण्याच्या उद्देशानं हा निर्णय घेतला आहे.




पोस्टानं सर्व सरकारी विभाग, न्यायालयं, विद्यापीठे आणि इतर संस्थांना १ सप्टेंबरपूर्वी त्यांच्या सेवा स्पीड पोस्टला हस्तांतरित करावे असं सांगण्यात आलं आहे.ब्रिटिश काळापासून, म्हणजे सुमारे १७१ वर्षांपासून ही सेवा सुरू होती. आता ही सेवा जनसामान्याला निरोप देणार आहे. जेव्हा इंटरनेट नव्हतं, मोबाईल नव्हते तेव्हा ही पत्रं अनेकांच्या भावना व्यक्त करण्याचे साधन होते. पत्राबद्दल आजही अनेकांच्या भावना जोडल्या आहेत. आता पत्रं ही आठवणीत राहणार आहे.

टपाल सेवा बंद झाल्यानंतर, पोस्ट सेवा महाग होणार आहे. ज्यामुळे सामान्य नागरिकांसाठी आणि विशेषतः शेतकरी, लहान व्यापारी आणि ग्रामीण भागातील लोकांसाठी पोस्टाच्या सेवेचा खर्च वाढणार आहे. जे स्वस्त टपाल सेवांवर अवलंबून आहेत.

स्पीड पोस्ट सेवेची किंमत ५० ग्रॅमपर्यंत ४१ रुपयांपासून सुरू होते, तर रजिस्टर्ड पोस्ट २४. ९६ रुपये आणि त्यानंतर प्रत्येक अतिरिक्त २० ग्रॅमसाठी ५ रुपये मोजावे लागणार आहे. ज्यामुळे ती स्पीड पोस्टपेक्षा २० ते २५% स्वस्त होते. दरम्यान यासंदर्भात पोस्टाकडून सांगण्यात आलं की, या सेवेच्या मागणीत घट पाहिला मिळत आहे.

डिजिटल सेवा, ई-मेल, खासगी कुरिअर कंपन्या यांचा वापर दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. यामुळे पारंपरिक टपाल सेवेचा वापर कमी झाल्याच चित्र आहे. २०११-१२ मध्ये जवळपास २५ कोटी रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पार्सल पाठवल्याची नोंद आहे. ती सध्या २०१९-२० मध्ये १८ कोटींपर्यंत घसरली आहे. यामुळे पोस्टाने ही सेवा बंद करण्याचा निर्णय घेतल्याच पोस्टाकडून सांगण्यात आलं आहे.

# तेली समाजातील गुणवंतांचा व शासकीय सेवेत रुजू झालेल्यांचा सत्कार संपन्न

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०९, मुदखेड (नांदेड) :** दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी तेली समाज सेवाभावी संस्थान यांच्या वतीने तेली समाजातील गुणवंत विद्यार्थांचा शासकीय नवनियुक्त अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त कर्मचारी यांचा सत्कार सोहळा तसेच रक्तदान शिबीर नुकताच नांदेड प्रतिभा निकेतन कॉलेज सभागृह बंदाघाट रोड येथे संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.लेनिना यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल कसे वाढवावे. यासाठी मार्गदर्शन करून त्यांना ओम ध्वनीद्वारे आपली गुणवत्ता कशी वाढवावी. यासाठी अमूल्य मार्गदर्शन केले त्यांनी विद्यार्थ्यांच्या समूहांमधील जाऊन एक वेगळेपणा जाणून विद्यार्थ्यांचा समावेश संभाषण केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विश्वस्त राम सावकार सूर्यवंशी तर प्रमुख संस्थेचे अध्यक्ष अँड बालाजीराव बनसोडे प्रमुख वक्त्या म्हणून डॉक्टर लेनिना एस.व्ही.बी सहाय्यक प्राध्यापिका गुरुगोविंद सिंगजी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्था नांदेड व भावना नितीन शिक्षिका गल्फ एशियन इंग्लिश स्कूल दुबई, संस्थेचे माजी अध्यक्ष समाज भूषण शेषराव अलोने, दशरथ रावजी शिवलाड संस्थेचे सचिव लक्ष्मणराव शिरसागर, बनसोडे, निवृत्त पीएसआय अशोक बिजवे, नंदकिशोर झोळगे, नारायणराव बनसोडे, ईश्वर पिन्नलवार, सखाराम क्षिरसागर, चंद्रकांत दगडफल्ले, स्वाती आलोने यांची उपस्थित होती.कार्यक्रमाचा प्रास्ताविक तेली समाजाचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मणराव क्षीरसागर यांनी केले.

या कार्यक्रमांमध्ये ६२ गुणवंत विद्यार्थी पहिली, चौथी, पाचवी, आठवी, दहावी, बारावी, डी.फॉर्म, बी.फार्म, बी.ए, बी.कॉम, एम.एम.कॉम, बी.एस.सी, एम.एस.सी, बी.टी.एम. टेक, आयआयटी, इंजीनियरिंग सर्वांचा यथोचित मोमेंटो व नगदी स्वरूपात पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला.तेली समाजातील पदोन्नती मध्ये पोलीस अधिकारी म्हणून पदोन्नती अनिल गव्हाणकर तसेच नव्याने महाराष्ट्र शासनाने नगर रचनाकार साहाय्यक पदावर शुभम साईनाथ पिन्नलवार व दुसरा स्वप्निल व्यकटपुरवार यांचे शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बालाजीराव बनसोडे, लक्ष्मणराव क्षीरसागर, शेषेराव आलोने, गणेश रावजी सूर्यवंशी, महिला अध्यक्ष जिजाबाई तगडपले, शंकरराव परकंठे, चंद्रकांत अटकळीकर, माधवराव परगेवार, घाडगे, नंदकिशोर झोळगे यांच्यासह आदीने परिश्रम घेतले आहे. या कार्यक्रमास जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक बालाजी यशवंतकर यांनी केले तर आभार प्रदर्शन चंदकांत आटकळीकर यांनी मानले.

# थोडक्यात

## N.S.S च्या विध्यार्थिनीनी पोलिसांच्या हातावर बांधली राखी



**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०८, मिरा भाईंदर :** भाईंदर पूर्वच्या अभिनव कॉलेज मधील N.S.S युनिटच्या विद्यार्थिनींनी राखी पौर्णिमेच्या निमित्ताने दिनांक ०८ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ च्या सुमारास नवघर पोलीस ठाण्यात कर्तव्यावर असणाऱ्या सर्व पोलिसांच्या हातावर राखी बांधली आहे. राखी बांधत विद्यार्थ्यांनी पोलीस अधिकाऱ्यांसोबत रक्षाबंधन साजरे केले आहे. जवळपास एन.एस.एस युनिटच्या २५ ते ३० विद्यार्थिनी यावेळी शिक्षकांसोबत पोलीस ठाण्यात उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे आयोजक प्राचार्य डॉ.अल्विन मेनेझेस, अभिनव कॉलेज N.S.S युनिट व N.S.S क्षेत्रीय समन्वयक प्रा.अरुणा गुजर, N.S.S कार्यक्रम अधिकारी प्रा.भाग्यश्री माने, N.S.S सदस्य प्रा.तरुशी सिंह हे होते. अभिनव कॉलेजच्या N.S.S युनिटने राखी पौर्णिमेच्या निमित्ताने नवघर पोलीस स्टेशन मधील पोलीस अधिकाऱ्यां सोबत रक्षाबंधन साजरे केले. कर्तव्या पुढे पोलिसांना नाती बाजूला ठेवावी लागतात. या करताच खरे हिरो असणाऱ्या पोलिसांचे हात राखी शिवाय रिकामे राहू नयेत या उद्दिष्टाने पोलिसांच्या हातावर राखी बांधून आनंद मिळवण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांच्या मार्फत करण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. आपल्या सुरक्षिततेसाठी पोलीस विभागाने केलेल्या अथक प्रयत्नांच्या कृतज्ञतेपोटी आणि समाज व कायदा अंमलबजावणी यंत्रणेमधील बंध अधिक दृढ करण्यास सर्व जण उत्सुक असल्याचे कॉलेजच्या मार्फत सांगण्यात आले. हा क्षण शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी अतिशय खास व अभिमानास्पद होता. असे विद्यार्थ्यांच्या मार्फत सांगण्यात आले आहे.

## बॉक्सिंग स्पर्धेत वाई तालुक्यातील शाळेचे यश




**अक्षराज : दिलीप कांबळे**

**दि.०९, वाई (सातारा) :** नागपूर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय स्थायी बॉक्सिंग स्पर्धे त सातारा वाई संघ तृतीय क्रमांकाचा मानकरी ठरला. या स्पर्धेत महाराष्ट्र राज्यातून साडेतीनशेच्यावर स्पर्धकांनी भाग घेतला होता. स्पर्धेत वाई तालुक्यातील स्पर्धकांनी उल्लेखनीय कामगिरी केली. १२ स्वर्ण पदके, ९ रौप्य पदके, ९ कास्यस्पदके मिळवून नेत्र दीपक कामगिरी केली. त्यात ज्ञानदीप स्कूल सेंट थॉमस स्कूल द्रविड हायस्कूल वाई कन्या शाळा वाई बुद्धिस्ट इंटरनॅशनल स्कूल वाई जिल्हा परिषद शाळा बावधन आदी शाळांनी सहभाग घेतला होता. त्यातील सुवर्णपदक खेळाडू शुभ्रा शिंदे, सना शेख, सई धायगुडे, वैष्णवी भोरे, कुमार विविध लेंबे, मोहम्मद अली शेख रु हो तुझं झालं समर्थ जाधव सिद्धार्थ तानाजी कचरे सारंग पडवळ वेदांत भोसले रुद्र पवार शिवम गायकवाड यांनी सुवर्णपदक पटकावले तर रौप्य पदाचे मानकरी उन्नती मोरे स्वराज्य ढेरे अथर्व फाळके सत्यम डेरे पारस देवकर राजवीर कोरडे हर्षवर्धन विटकर मोहित काळभोर शिवकचरे हे होते. कास्य पदाचे मानकरी वैष्णवी भोसले तनिष्का पोफळे कुबेर थोरात संभाव यादव यांनी पटकावले. या स्पर्धेत जिल्हा परिषद शाळा बावधन पाचवीतील विद्यार्थी सिद्धार्थ तानाजी कचरे याने २५ वजन गट असताना थेट ३२ किलो गटात उतरून सुवर्णपदक पटकावले वाई तालुक्यातील नामवंत शाळेची दिवसेंदिवस खेळामध्ये चमकदार कामगिरी दिसते सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पालकांचे प्रोत्साहन तसेच शाळेमध्ये उत्कृष्ट प्रशिक्षकाचे योग्य मार्गदर्शन त्यात शिक्षकांची प्रेरणा व मोलाची साथ लाभल्याने या तिन्ही प्रकारांमध्ये तालुक्यातील शाळांच्या विद्यार्थ्यांनी पदके पटकावून तालुक्याचे नाव उंचावले सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील यांनी कौतुक केले.

## किन्हवली येथे जल्लोषात जागतिक आदिवासी दिन साजरा



**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.०९, शहापूर (ठाणे) :** शनिवार, दिनांक ०९ ऑगस्ट २०२५ रोजी किन्हवली येथे जागतिक आदिवासी दिन आदिवासी युवा संघटनेच्या पुढाकारांने जल्लोषत साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे लहान आदिवासी मुलांचे आदिवासी पोशाख मध्ये नृत्य रॅलीमध्ये सादर करण्यात आले. कोणत्याही प्रकारचे जातीपातीचे राजकारण न समजता किन्हवली विभागातील सर्वच बिगर आदिवासी नेत्यांनी व सामान्य जनतेने मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. शहापूर पूर्व मंडलचे अध्यक्ष व माजी उपसभापती सुभाष हरड व आदिवासी युवा संघटनेचे अध्यक्ष तथा संस्थापक चिंतामण शेंडे यांनी जमलेल्या समस्त आदिवासी बांधवांना मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच किन्हवली पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन खैरनार व पोलीस बंधूंनी सुद्धा रॅली संपूर्ण किन्हवली मधून फिरण्यासाठी विशेष सहकार्य केले. रॅलीमध्ये अनेक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सामील होऊन आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचा भार आदिवासी युवा संघटनेचे ठाणे जिल्हा मोर्चा प्रमुख जयवंत वाघ, ठाणे जिल्हा सचिव यशवंत फर्डे, कार्याध्यक्ष भगवान देसले, शहापूर तालुका अध्यक्ष जगन्नाथ निरगुडा, महिला तालुकाध्यक्ष बायडीबाई पारधी, कर्मचारी तालुका शहापूर तालुकाध्यक्ष दत्तात्रय कणकोसे व त्यांच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी सांभाळला. शिवाय या रॅलीमध्ये किन्हवली विभागातून अनेक आदिवासी सरपंच, पोलीस पाटील आणि आदिवासी कार्यकर्ते उपस्थित होते.

## जागतिक आदिवासी दिनानिमित्त ज्ञानेश्वर डाखोरे यांचे मार्गदर्शन



**अक्षराज : कैलास राठोड**

**दि.०९, किनवट (नांदेड) :** मदनापुर येथील जागतिक आदिवासी दिनाच्या कार्यक्रमात ज्ञानेश्वर डाखोरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. आपल्या भाषणात त्यांनी मूलनिवासींच्या हक्कांविषयी, शिक्षणाचे महत्त्व तसेच समाजातील प्रत्येकाने आपल्या हक्कांविषयी जागरूक राहण्याची गरज यावर भर दिला.

डाखोरे यांनी सांगितले की, शिक्षण ही प्रगतीची किल्ली असून आदिवासी समाजाने शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःची ओळख निर्माण करून हक्कांसाठी सजग राहिले पाहिजे. कार्यक्रमाला स्थानिक नागरिक, विद्यार्थी व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.